# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र-०४ दिनांक: ०५/०१/२०२४

## सायबर रिल्स स्पर्धेचे पारितोषिक समारंभ

सर्व प्रसारमाध्यमाचे प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयाचे वतीने सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात इन्स्टाग्राम या लोकप्रिय सोशल मिडीया ॲपच्या माध्यमातून जनतेमध्ये जनजागृती होणेसाठी सायबर रिल्स स्पर्धेचे दिनांक ०४.११.२०२३ ते दिनांक ३१.१२.२०२३ रोजी दरम्यान आयोजन केलेले होते.

नमूद स्पर्धेतील प्रथम पारितोषिक विजेते श्री. विकास गौतम यांस २१,००० रुपये, द्वितीय पारितोषिक विजेते श्री. साहील दळवी यांस १५,००० रुपये व तृतीय पारितोषिक विजेते श्री. भारत सिंग, यांस ११,००० रुपये व उत्तेजनार्थ १. श्री. वेदांत चासकर २. श्री. यश संघनी ३. श्री. सनी रावल या स्पर्धकांना प्रत्येकी ५,००० रुपये बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रमुख पाहूणे पदमश्री मा. श्री सोनु निगम (सुप्रसिध्द पार्श्वगायक) यांचे हस्ते देवुन गौरविण्यात आले आहे.

बक्षीस वितरण कार्यक्रम दि. ०४.०१.२०२४ रोजी दुपारी १६.०० वा. स्वर्गीय लता मंगेशकर नाट्यगृह, ठाकुर मॉलचे शेजारी, काशिमीरा येथे पार पडला. नमुद कार्यक्रमादरम्यान काशिमिरा पोलीस ठाणे येथील सायबर गुन्हयांत हस्तगत केलेले २३,१३,००० रुपये तक्रारदार यांना परत करण्यात आले.

नमुद स्पर्धा श्री जयंत बजबळे, पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-१ यांनी तसेच परिमंडाळातील अधिकारी यांनी आयोजीत केली होती. कार्यक्रमादरम्यान वसई विरार परिसरातील सेंट जोसेफ कॉलेज, विरार, विवा कॉलेज, विरार, सहयाद्री कॉलेज, वसई यांनी सायबर गुन्हे जनजागृतीच्या अनुशंगाने पथनाटय सादर केले.बापुजी जाधव महाविद्यालय, चांदीप यांनी तारपा नृत्य व पथनाट्य सादर केले. तसेच सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन धनश्री प्रधान-दामले यांनी केले. नमुद संपुर्ण स्पर्धा पार पाडण्यासाठी श्री धिरज मिश्रा यांनी मोलाचे सहकार्य केल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला.

नमुद कार्यक्रमास प्रमुख पाहूणे पदमश्री मा. श्री सोनु निगम (सुप्रसिध्द पार्श्वगायक), तसेच श्री मधुकर पाण्डेय, मा.पोलीस आयुक्त, मिराभाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय, श्री अविनाश अंबुरे, मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्री.प्रकाश गायकवाड,पोलीस

उपआयुक्त(मुख्यालय) श्रीमती पौर्णिमा चौगुले, पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-२,श्री सुहास बावचे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-३, श्री जयंत बजबळे, पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-१ तसेच पोलीस आयुक्तालयातील इतर अधिकारी अंमलदार, मिराभाईंदर वसई विरार परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थी, पत्रकार यांचे उपस्थितीत पार पडला.